# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# // प्रसिद्धी पत्रक//

- **एकल/निराधार/ घटस्फोटित महिला यांच्या मुलांकरिता शिक्षणाच्या आर्थिक मदतीमध्ये वाढ**

मिरा भाईंदर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत शहरातील एकल, निराधार आणि घटस्फोटित महिला यांच्या मुलांकरिता शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीमध्ये वाढ करुन त्याच्या मुलांच्या शिक्षणास प्रोत्साहान मिळावे या दृष्टीने शिक्षणाबाबत सकारात्मक भुमिका घेवुन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त (मुख्यालय/मबाक) श्रीम. कल्पिता पिंपळे यांच्या विशेष प्रयत्नांनी वाढीव धोरणास मान्यता देण्यात आली आहे.

**मागील ठराव व सुधारणा :**

महानगरपालिका मा.महासभा ठराव क्रमांक 76,दि.31/01/2020 नुसार, एकल, निराधार आणि घटस्फोटित महिलांच्या मुलांना शिक्षणाकरिता आर्थिक मदत देण्याचा निर्णय पारित झाला होता. त्याअंतर्गत आजपर्यंत अंदाजित 1260 लाभार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे. दरम्यानच्या कालावधीत वाढती महागाई, शाळा व महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात झालेली वाढ या बाबीचा विचार करून, आर्थिक मदतीच्या रकमेमध्ये सरासरी प्रती वर्षी 10% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी सुधारित धोरण तयार करुन लाभार्थ्यांच्या अटीशर्ती, वार्षिक मदत व शाळेची कमाल फी यामध्ये आवश्यक सुधारणा करणेत आली आहे.

**जुन्या ठरावानुसार व दि.29/05/2025 रोजी पारित केलेल्या सुधारित प्रशासकीय ठरावानुसार शैक्षणिक आर्थिक मदत दयावयाचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे**

**जुन्या ठरावानुसार**
**मा.महासभा ठराव क्र.76, दि.31/01/2020 अन्वये**

| अ. क्र. | शैक्षणिक वर्ष | संबंधित शाळेची कमाल फी खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे. | वार्षिक मदत रुपये (प्रती लाभार्थी) |
|---|---|---|---|
| 1. | इयत्ता 1 ते 5 | रु.21000/- | रु.7000/- |
| 2. | इयत्ता 6 ते 8 | रु.30,000/- | रु.10,000/- |
| 3. | इयत्ता 9 ते 12 | रु.36000/- | रु.12000/- |
| 4. | इयत्ता 13 ते पदवी | रु.45000/- | रु.15000/- |

**सुधारीत ठरावानुसार**
**प्रशासकीय सभा दि.29/05/2025 ठराव क्र.88 अन्वये**

| अ. क्र. | शैक्षणिक वर्ष | संबंधित शाळेची कमाल फी खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे. | वार्षिक मदत रुपये (प्रती लाभार्थी) |
|---|---|---|---|
| 1. | इयत्ता 1 ते 5 | रु.30,000/- | रु.10,000/- |
| 2. | इयत्ता 6 ते 8 | रु.40,000/- | रु.14,000/- |
| 3. | इयत्ता 9 ते 12 | रु.50000/- | रु.17,000/- |
| 4. | इयत्ता 13 ते पदवी | रु.65000/- | रु.20,000/- |

## 📝 **आवश्यक कागदपत्रे व अटी (सुधारित):**

1. मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील किमान ५ वर्षांचा रहिवासी पुरावा
2. शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र
3. शिधापत्रिका व आधार कार्ड
4. एकल/निराधार/घटस्फोटीत महिलांचे वय १८ ते ५५ वर्षांदरम्यान असल्याचा शासकीय पुरावा
5. अर्जासोबत वडीलाचा/पतीचा मृत्यू दाखला / घटस्फोटात असल्यास त्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
6. चालू वर्षाची शैक्षणिक फी, शैक्षणिक शुल्क मागणी पत्र/शुल्क भरणा केलेला असल्यास पावती जोडणे आवश्यक आहे.
7. अनाथ बालकांबाबत (दोन्ही पालक गमावलेल्या) संगोपन करणाऱ्या इतर नातेवाईक यांचा रहिवाशी पुरावा (मिरा-भाईंदर)
8. अनाथ बालकांकरिता आई-वडिलांचे मृत्यू दाखला जोडणे आवश्यक आहे.
9. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे स्वसाक्षांकित (Self -Attested) केलेली असावीत.
10. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आर्थिक मदत मंजूर करणे किंवा नाकारण्याचा अंतिम अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

## ◈ **विवाह सहाय्य बाबत:**

मुलींच्या विवाहासाठीचा आर्थिक सहाय्यबाबत मान्यताप्राप्त महासभा ठराव क्र. ७६, दि. ३१ जानेवारी २०२० अन्वये ठरविलेल्या अटी व शर्ती पूर्वीप्रमाणेच (जैसे थे) कायम ठेवण्यात आल्या आहेत.

## 📢 **महत्त्वाचे आवाहन:**

मिरा भाईंदर शहरातील एकल, निराधार आणि घटस्फोटित महिलांच्या मुलांना शिक्षणाकरिता आर्थिक मदत व विवाहाकरिता आर्थिक सहाय्य या योजनेचा लाभ घेण्यासाठी महानगरपालिकेच्या mbmc.gov.in या वेबसाईटवर व महिला व बालकल्याण विभाग,तळ मजला, मुख्यकार्यालय, भाईंदर(प.) येथे संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी केले आहे